# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोचे फक्त दीड टक्का भुयारीकरण शिल्लक






**८३२ मीटरचे भुयार करून टीबीएम मुंबई सेंट्रल स्थानकात पोहोचली**

मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) - कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पाच्या भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा आज यशस्वीरीत्या पूर्ण झाला. 'तानसा-२' ही टनेल बोअरिंग मशीन महालक्ष्मी मेट्रो स्थानकापासून डाऊन लाइन मार्गाचे ८३२.५ मीटर भुयारीकरण करत मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकात पोहोचली. ५५५ सिमेंट रिंग्सच्या सहाय्याने २६२ दिवसांत हे भुयारीकरण पूर्ण झाले. मेट्रो-३ प्रकल्पाच्या भुयारीकरणाचे ९८.६० टक्के काम पूर्ण झाले असून आता फक्त दीड टक्केच काम शिल्लक आहे.

मेट्रो-३ प्रकल्पातील पॅकेज-३ मध्ये पाच स्थानके असून या प्रकल्पातील हा सर्वात लांबचा टप्पा होता. या पॅकेजमध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. या पॅकेजमधील भुयारीकरणाचे पाच टप्पे आतापर्यंत पूर्ण झाले आहेत. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण कुलाबा ते सीप्झपर्यंत मेट्रो-३ प्रकल्पाचे संपूर्ण डाऊन लाइन भुयारीकरण पूर्ण झाल्याची घोषणा करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे, अशी प्रतिक्रिया मुंबई महानगर आयुक्त आणि मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी यावेळी दिली.